**महाराष्ट्र शासन**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड**
**वसंतनगर उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ**

Email arcs.yml.ukd@gmail.com

क्र.सनिउ/नियमन /कलम७७ अ/१६/१७ दुरध्वनी क्रमांक :- ०७२३१२३७२६८

दिनांक :६.७.२०१७

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अंतर्गत आदेश**

वाचा:-

१. मा. सचिव राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांचा आदेश क्रमांक रासनिप्रा /कक्ष-९/ यवतमाळ / ड वर्ग कृ.आ.मान्यता /९७७९/ २०१५ दिनांक :-३१.१२.२०१५

२. श्री. ओ.एम. पहुरकर प्राधिकृत अधिकारी जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन)यांचा दि.२९.३.२०१६ चा अहवाल.

३. मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांचा दि.२९.३.२०१६चा आदेश

४. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनिमय १९६० चे कलम ७७अ

ज्याअर्थी, जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) र.नं. ११७ ता.उमरखेड जि.यवतमाळ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था असून उक्त कायदा, नियम व संस्थेचे उपविधी यामधील तरतुदीनुसार संस्थेचे कामकाज करण्याची वैधानिक जबाबदारी संस्था सदस्यांची व समितीची आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्र. १ नुसार जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) ता.उमरखेड जि.यवतमाळ या ड वर्गातील संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणुक घेण्यासाठी श्री. ओ. एम. पहुरकर सहकार अधिकारी श्रे-२ अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रमांक २ नुसार जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) या संस्थेची दि.१२.३.२०१६ रोजी संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक घेण्याकरीता नोटीस काढण्यात आली व दि.२९.३.२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता रुखमिनी मंदिर चिखली (वन) ता.उमरखेड जि.यवतमाळ येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु दि.२३.३.२०१६ रोजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर येथे श्री.नितीन प्रकाश नापते यांचेमार्फत writ petition दाखल झाली व संदर्भिय आदेश क्रमांक २ नुसार दि.२९.३.२०१६ रोजी सकाळी ११.२०वाजता मा. उच्च न्यायालयाने जंगल कामगार सहकारी संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीस पुढील आदेशपर्यंत स्थगीती दिली आहे . त्यामुळे आज दि.२९.३.२०१६ रोजी दुपारी १.०० वाजताची जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन ) या संस्थेची विशेष बैठक घेण्यात आली नाही व संचालक मंडळाची निवड करण्यात आली नाही, असे या कार्यालयास प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त वाचा क्रमांक २ नुसार कळविलेले आहे.आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रमांक ३ नुसार मा.उच्च न्यायालय खंडपीठ मुंबई नागपुर यांनी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीस पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे. परंतु अद्यापर्यंत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर यांचेकडुन संस्थेच्या निवडणुकीबाबत कोणताही आदेश प्राप्त झालेला नाही आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (१-अ) (ब) मध्ये कोणत्याही समितीचा किंवा तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी संपला म्हणुन किंवा इतर कोणत्याही कारणासाठी निवडणुक घेण्यात आली व त्यावेळी

Scanned by CamScanner

रिकाम्या जागा भरण्यासाठी आवश्यक असलेले सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसुर झाली आहे, तेव्हा नविन समिती पदग्रहण करीतोपर्यंत संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी एक किंवा अधिक प्राधिकृत अधिकारी नेमता येतील अशी तरतुद आहे.आणि,

ज्याअर्थी, जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) या संस्थेच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी व संस्थेचे इतर अनुषंगिक कामकाज सुरळीत चालु ठेवण्यासाठी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (फ) (दोन) चे परंतुकान्वये नोटीस प्रसिध्द न करता तात्काळ प्राधिकृत अधिकारी नेमणुक करणे आवश्यक व क्रमप्राप्त झाले असल्याची माझी खात्री झाली आहे .आणि,

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

-::आदेश::-

मी एस.एस.भालेराव सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड , महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१) (१-अ) (ब) मधिल तरतुदीनुसार जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) र.नं. ११७ ता.उमरखेड जि.यवतमाळ ... संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी श्री.ए.डी.भागानगरे सहकार अधिकारी श्रे-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड हयांची पुढील ६ महिण्याकरीता सदर संस्थेवर प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. संस्थेचे प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेचे उपविधी व कार्यालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कामकाज करावे.

सदर आदेश आज दि.६.७.२०१७ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेनिशी देण्यात येत आहे.

(एस.एस.भालेराव)
सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था उमरखेड

प्रति,
१ अध्यक्ष / सचिव, जंगल कामगार सहकारी संस्था म. चिखली (वन) र.नं. ११७ ता.उमरखेड जि.यवतमाळ यांना सुचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी यांना संस्थेचा पदीभार देवुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.
२.श्री.ए.डी.भागानगरे सहकारी अधिकारी श्रे-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था उमरखेड ता.उमरखेड जि.यवतमाळ यांना सुचित करण्यात येते की, सदर संस्थेच्या प्राधिकृत अधिकारी पदाचा प्रभार स्वीकृत करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा व विहित मुदतीत निवडणुक घेण्याची कार्यवाही करावी.
३.मुख्य कार्यकारी अधिकारी , यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ यांना माहितीकरीता अग्रेषित.
४.शाखा व्यवस्थापक , यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.यवतमाळ शाखा चिखली (वन) ता.उमरखेड जि.यवतमाळ यांना माहितीकरीता अग्रेषित .

प्रतिलीपी सादर:-
१.मा.सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३.मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था यवतमाळ यांना माहितीस्तव सविनय सादर.

सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था उमरखेड



Scanned by CamScanner